0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचावे :- १) या कार्यालयाचे आदेश क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७५/२०१२/जा.१५८, दि.२७/०२/२०१३.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचे दिनांक ११ मार्च, २०१३ रोजीचे विनंती पत्र.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७५/२०१२/जा.२२३
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई ४०० ०२०.

दिनांक : १८/३ /२०१३.

### आदेश शुध्दीपत्र

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

उपरोक्त वाचावे क्र. २ अन्वये, " गुन्हा नोंद क्र. ३११२/२०१२, दिनांक ०३.११.२०१२, तुर्भे पोलिस ठाणे अन्वये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाबाबत विल्हेवाटीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. जप्त करण्यात आलेल्या १६०३ क्विंटल तांदूळाच्या साठ्यापैकी ५८ क्विंटल कणी तांदूळाचा साठा असुन त्यापैकी काही साठा सर्वसाधारण दर्जाचा असून २० ते २५ बाचक्यांमधील कणी तांदूळाचा साठा धुळ मिश्रीत निकृष्ठ कणी साठा असल्याबाबत सहा. शिधावाटप अधिकारी (तपासणी), शिधावाटप कार्यालय क्र. ४१/फ, वाशी यांनी फ परिमंडळ, ठाणे कार्यालयास कळविले आहे. सदर ५८ क्विंटल तांदूळाच्या कणीचे अधिकृत शिधावाटप दुकानांमध्ये वितरण केल्यास शिधापत्रिकाधारकांच्या मोठ्या प्रमाणावर तक्रारी प्राप्त होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे नमूद करुन सदर ५८ क्विंटल तांदूळाच्या कणीबाबत सुधारीत आदेश होणेस विनंती केलेली आहे. "

सबब, या कार्यालयाचे वाचावे क्र. १ अन्वये पारित केलेल्या आदेशामध्ये या शुध्दीपत्रकानुसार सुधारणा करण्यात येत असून त्यामध्ये आदेश क्र. ४ " शासनजमा करण्यात आलेला ५८ क्विंटल कणी तांदळाचा साठा हा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे (दुरध्वनी क्र. ०२२-२५३३२६५७) यांचे मदतीने वैध

0002

परवानाधारकांस कणी तांदळाच्या गुण व दर्जेनुसार प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. "

असे वाचावे.

सही/—
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. अेस इंटरनॅशनल (Ace) चे मालक पंकज ठक्कर
२) मे. मेट्रो इंटरनॅशनलचे मालक/भागीदार/व्यवस्थापक
३) मे. गजानन ट्रेडिंग कंपनीचे मालक/भागीदार/व्यवस्थापक
(वरिष्ठ पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित. त्यांना कळविण्यात येते की, आदेशात नमुद केल्याप्रमाणे सात दिवसाचे आत कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा. सदरच्या कार्यवाहीस विलंब होऊन तांदळाचा साठा खराब झाल्यास त्याची जबाबदारी आपल्यावर राहील याची नोंद घ्यावी.

३) कार्यासन अधिकारी, का.क्र. २, मागणी शाखा, प्रधान कार्यालय यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता अग्रेषित.

४) कार्यासन अधिकारी, का.क्र. ५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता अग्रेषित.

५) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

६) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.